कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २३/०९/२०१७

# महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१७ मध्ये गडचिरोली पोलीस दलात कार्यरत धायाचित्रकार श्री. देवेंद्र पिदुरकर यांची फोटोग्रॉफी विषयात रौप्य कामगिरी

महाराष्ट्र पोलीस अकॅडमी नाशिक येथे दिनांक १३/०९/२०१७ ते १८/०९/२०१७ दरम्यान १५ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१७ पार पडला. सदर पोलीस कर्तव्य मेळाव्यात महाराष्ट्रातील सर्व पोलीस आयुक्तालये तसेच परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. सदर मेळाव्यात पोलीस श्वान पथक, घातपात विरोधी तपासणी, पोलीस फोटोग्रॉफी व व्हिडीओग्रॉफी, साइंटिफीक एड टू इन्व्हेस्टिगेशन, कॉम्प्युटर अव्हेरनेस या विषयाबाबतच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धेमध्ये राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये तसेच परिक्षेत्रातील, प्रत्येक विषयाकरीता एका संघाने सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेदरम्यान पोलीस फोटोग्राफी या विषयात स्थागुशा गडचिरोली येथे कार्यरत असलेले धायाचित्रकार श्री. देवेंद्र शिवराम पिदुरकर यांनी रौप्य पदक मिळविले आहे. आता त्यांची राष्ट्रीय पातळीवर पोलीस कर्तव्य मेळाव्याकरीता (ऑल इंडिया पोलीस डयुटी मीट) निवड झाली आहे. गडचिरोली पोलीस दलातर्फे पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी यांनी देवेंद्र पिदुरकर यांचा पोलीस अधिक्षक कार्यालयात सत्कार केला व राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण कामगिरी करुन जिल्हयाचे नाव आणखी उज्ज्वल करण्याकरीता त्यांना सुवर्णमय शुभेच्छा दिल्या. श्री. देवेंद्र पिदुरकर

यांनी रौप्य पदक मिळवून गडचिरोली परीक्षेत्राचे नाव राज्य पातळीवर उज्ज्वल केले आहे. त्यांच्या उज्ज्वल भावी आयुष्यासाठी पोलीस विभागातर्फे खुप-खुप शुभेच्छा.

